दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १२१ वा गुरूवार दि.१७ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## महायुतीच्या सरकारच्या कार्यकाळात गुजरात राज्यात हलवलेले उद्योग पुन्हा महाराष्ट्रात आणण्यासाठी महाविकास आघाडीला विजयी करा





लातूर :- दहा वर्ष हवेत असणारे सरकार ४०० पार चा नारा देत होते पण इंडिया आघाडींने त्यांना २४५ वर रोखले आहे .दिल्ली ही देशाची राजधानी आहे तर मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे . देशाच्या एकूण टॅक्स पैकी ८०% टॅक्स मुंबईहून जातो ४०% महाराष्ट्रातून उत्पन्न दिल्ली सरकारला मिळतोय आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना अनेक उद्योगपती महाराष्ट्रात अनेक उद्योग निर्माण करण्यासाठी उत्सुक होते मात्र या महायुतीच्या काळात येणारे उद्योग महायुती सरकारने गुजरातकडे वळवले हे थांबवण्यासाठी राज्यात महाविकास आघाडी च्या उमेदवारांस मतदान करुण राहुल गांधी, शरदचंद्र पवार , उद्धव ठाकरे यांचे हात बळकट करा शाहू ,फुले, आंबेडकर छत्रपती शिवाजी महाराज यांचा समतेचा विचार जोपासण्यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांना निवडून द्या असे आवाहन त्यांनी केले . मागच्या विधानसभा निवडणुकीतील मताधिक्याचे रेकॉर्ड तोडून अधिक मताधिक्य द्या यावेळी बोलताना दिलीपराव देशमुख साहेब म्हणाले की लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख निवडून तर येणारच आहेत पण किती मताधिक्य देणार ते मताधिक्य यापूर्वीचे रेकॉर्ड मोडणारे असावे अशी अपेक्षा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली गावागावात विरोधक आहेत विरोधकांनाही आपल्या घरी चहा पिण्यासाठी बोलवा असा सल्लाही त्यांनी याप्रसंगी कार्यकर्त्यांना दिला शेतीमालाचे भाव दहा वर्षे वाढत नाहीत शेतकऱ्यांना स्वाभिमान योजना राबवली जाते प्रतिदिन १७ रुपये ३३ पैसे हे सरकार देते आहे १७ रुपये ३३ पैसे नको पण आमच्या सोयाबीनला भाव द्या. आफ्रिका ऊन येणारे सोयाबीन बंद करा आणि लातूरचे सोयाबीन खरेदी करा असा मौलिक सल्लाही त्यांनी यावेळी दिला सेवेच्या माध्यमातून बँक चालवली जाते पण ती दिवाळी खोरीत निघणार नाही याची आम्ही काळजी घेतो मांजरा परिवारातील सर्व साखर कारखाने एफ आर पी आधिक भाव देवुन शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम आम्ही केले पुढेही करणार असून यासाठी लातूर शहर मतदार संघातून अमित देशमुख तर लातूर ग्रामीण मतदार संघातून धीरज देशमुख यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे त्यांना आशीर्वाद द्या असे आवाहन त्यांनी केले राज्य सरकार दिवाळखोरीत राज्यातील महायुती महाराष्ट्र सरकार दिवाळखोरीत असल्याचे सांगून आम्हीं सत्तेत असताना दोन वेळा अर्थसंकल्प मांडला सर्व समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे असे सांगून पुन्हा एकदा महाविकास आघाडीला सत्तेत आणण्यासाठी जिल्ह्यातिल सर्व आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्यावे असे आवाहन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले आहे बूथ प्लस करा

निवडणुकीचा ज्वर सुरु झालेला आहे अफवावर विश्वास ठेवू नका लातूरमध्ये अफवा लवकर पसरली जाते त्याकडे दुर्लक्ष करा ५० वर्षाचा विश्वासाचा प्रमाणिकपणाचा मांजरा ब्रँण्ड निर्माण केला आहे .प्रत्येक बूथ प्लस ठेवा ग्रामपंचायतची निवडणूक समजून ही निवडणूक आपणास लढावी लागेल समाजातील सर्व जाती-धर्मातील लोकांना भेटा सर्वजण आपलेच आहेत .भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी श्रीमंताला आणि गरिबाला एकच मतदानाचा अधिकार दिलेला आहे .असे सांगून सामाजिक आर्थिक शैक्षणिक , या सगळ्या प्रगतीसाठी आपण धिरज विलासराव देशमुख यांना निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. राज्यातील उद्योग महायुती सरकारने गुजरातकडे वळवले आमदार धीरज देशमुख यांची महायुती सरकारवर टीका गेल्या आडीच वर्षात राज्यात आलेले उद्योग सामंजस करार झालेले असताना महायुती सरकारने गुजरातकडे वळवले आहेत असा आरोप आमदार धीरज देशमुख यांनी करून या सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले नुसत्या घोषणा देवुन सर्व समाजाला फसवले आहे या उलट राज्यात अडीच वर्षापूर्वी सत्तेवर आलेले महाविकास आघाडी सरकारने कोविड काळात अतिशय चांगलं काम केलं लोकांना मोफत लस दिली जागतिक संघटनेने राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्याचे कौतुक केले असे सांगून आपत्कालीन परिस्थितीत मंत्री आमदार अमित राजेश टोपे, मंत्री आमदार अमितजी देशमुख साहेब यांनी राज्यातील लोकांना मदत केली दिवस रात्र फिरून लोकांना धीर दिला हे आपल्याला विसरता येणार नाही आताचे सरकारमधील लोक मात्र नुसत्या घोषणा देवुन वेळ मारून नेत आहेत याचाही आपण बारकाईने विचार करण्याची गरज आहे असे आमदार धीरज देशमुख यांनी सांगून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवार निवडून येणार आहे आपल्या मतदार संघात गावाची गरज ओळखून सर्व गावांना विकास कामांसाठी निधी दिला असून यापुढेही सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले तसेच आगामी निवडणुकीत काँग्रेस विजयी होईलच पण राज्याच्या मंत्रिमंडळात आपला वाढपी पाहिजे यासाठी जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघातून काँग्रेस महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना विजयी करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले यावेळी व्यासपीठावर लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासरावजी देशमुख,राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, मदन भिसे, इंदिरा सूतगिरणीचे चेअरमन बाळासाहेब कदम, जिल्हा बँकेचे संचालक अनुप शेळके, पृथ्वीराज शिरसाठ ,राजकुमार पाटील, अँड प्रवीण पाटील, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष घोडके,मांजरा साखर कारखान्याचे संचालक बाबुराव जाधव, बंकटराव कदम, रघुनाथ शिंदे संभाजीराव सुळ, पुंडलिक माने रणजित पाटील शाहुराव पवार ज्ञानेश्वर भिसे, रामदास पवार हरिराम कुलकर्णी शिवाजी कांबळे चांदपाशा इनामदार बालाजी पाटील धनंजय बावणे अभिमान भोले, अमोल भिसे संभाजी कदम, महेश अन्नदाते, मादळे, माणिक पुजारी यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते, बुथ प्रमुख उपस्थित होते

## ज्वेल ऑफ गार्डन नेरूळ नवी मुंबई येथे भव्यदिव्य बुद्ध मुर्ती (पुतळ्यांचे) भूमिपूजन

बेलापुर विधानसभा आमदार : मंदाताई म्हाञे यांच्या शुभहस्ते ज्वेल ऑफ गार्डन नेरूळ नवी मुंबई येथे बुद्ध मुर्ती (पुतळा) भूमिपूजन १४ आक्टोबर २०२४ रोजी करण्यात आले त्यावेळी ताई म्हणाल्या की हे काम शासकीय स्तरावर लवकरात लवकर पूर्ण करून घेणार याकामी शासकीय निधी कमी पडुदेणार नाही हे काम मला भव्यदिव्य, देखणे व सुंदर करायचेच आहे तथागत भगवंत गौतम बुद्ध हे माय फेवरेट लॉरड बुद्ध आहे माझ्या बंगल्याच्या मेन इंट्रीला तथागतांची मुर्ती आहे वंदन करूनच मि माझे कार्य करीत आसते आणि म्हणून या पार्कला भेट देण्यासाठी देश विदेशातील पर्यटक येतील आशे सुंदर आणि देखणे काम मी करणार..! यात जो कोणी टक्केवारीची भाषा व भ्रष्टाचार, घोटाळा आणि हलगर्जीपणा करील त्याची गय केली जाणार नाही, या कामी कोणीही जास्त गडबड घाई करू नये. शांतीदुत गौत्तम बुद्धांच्या मुर्ती चे काम शांततेणे व आपल्या सर्वांच्या सहकार्यातून करायचे आहे.



नवी मुंबई / के. हच. हनवते :- हि सारी भारत भूमि शांतीचे प्रतीक तथागत भगवंत गौतम बुद्धांची आहे आणि म्हणून १४ आक्टोबर १९५६ साली बौध्दिसत्व महामानव प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सम्राट अशोक विजया दशमी, धम्मचक्र प्रवर्तन दिनी स्वत:हा बौद्ध धम्माची दिक्षा घेतली व आपल्या सहा ते सात लाख लोकांना बौद्ध धम्माची दिक्षा देऊन बौद्ध धम्म गतीमान केला, या ऐतिहासिक दिनाचे महत्त्व समजुन नवी मुंबई मधील विविध पक्ष, सामाजिक संघटना व तसेच विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन दिनांक : १४- आक्टोबर -२०२४ रोजी, विश्व शांतीदुत तथागत भगवंत गौतम बुद्ध यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा भूमिपूजन सोहळा बेलापूर विधानसभेच्या विद्यमान आमदार: श्रीमती मंदाताई म्हात्रे यांच्या शुभहस्ते बुद्धमुर्ती व बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून (आरपीआय) आठवले नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे यांनी आगर बत्ती दीपप्रज्वलन केले व बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांनी सामुदायिक त्रिशरणपंचशील घेऊन कार्यक्रमास सुरवात करण्यात अली, हे ऐतिहासिक कार्य घडवून आणण्यासाठी (आरपीआय) आठवले नवी मुंबई जिल्हाध्यक्ष: महेश खरे यांनी शासकीय स्तरावर सतत पाठपुरावा करून सरकार मान्यता प्राप्त करून घेतल्यामुळे या ऐतिहासिक क्षणी नवी मुंबईतील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत ज्वेल ऑफ पार्क नवी मुंबई (गार्डन) सेक्टर - २८ नेरुळ नवी मुंबई येथे सायंकाळी ६ वाजता हा सोहळा साजरा करण्यात अला. त्यावेळी (आरपीआय) चे एल. आर. गायकवाड, चंदु जगताप, संदीप भाऊ जाधव (फिल्म इंडस्ट्री) रिपब्लिकन सेना : विरेंद्र लगाडे, बसपा विनोद धुरंधर, जे.के पोळ, बहुजन प्रेरणा सामाजिक संस्थापक अध्यक्ष : कल्याणराव हनवते सह पांडुरंग सरवदे, मिथुन कांबळे नवी मुंबई, खारघर, उलवे या परिसरातील बौध्द - आंबेडकरी अनुयायी व महीला शेकडोंच्या संख्येत उपस्थित होता.

## जरांगे यांच्याकडे ८०० जणांचे अर्ज



छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी मराठा आरक्षण आंदोलनकर्ते ते राजकीय पटलावर ताकद दाखविणा-या मनोज जरांगे यांनी उमेदवार उभे केले तर आपणही त्यात असावे असे वाटणा-या उमेदवारांच्या अर्जांनी अंतरवाली सराटीमध्ये गर्दी झाली आहे. आतापर्यंत राज्यातून ८०० हून अधिक अर्ज आले असल्याचे जरांगे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. दरम्यान, शिवसेनेत फूट पडल्यानंतर मराठवाड्यातून नऊ आमदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारले. यामध्ये मंत्री तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, संदीपान भुमरे, प्रदीप जैस्वाल, संजय शिरसाठ, ज्ञानेश्वर चौगुले, बालाजी कल्याणकर, संतोष बांगर, प्रा. रमेश बोरनारे यांचा समावेश होता. लोकसभा निवडणुकीपूर्वी 'ताकदवान' भाजपमध्ये राजकीय भवितव्य आहे, असे मानून प्रवेश घेणारी मंडळी आता पर्याय चुकला का, याची तपासणी करत आहेत. तर पक्षांतराच्या चाचपणीमध्ये आपण 'शरद पवार' यांचे नेतृत्व स्वीकारले तर कसे, याचीही चाचपणी करू लागले आहेत. पैठणमध्ये राष्ट्रवादीतून दत्ता गोर्डे, पैठण येथील संत एकनाथ साखर कारखान्याचे अध्यक्ष सचिन घायाळ, औरंगाबाद पश्चिम मतदारसंघात सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाठ यांच्या विरोधात राजू शिंदे, वैजापूरमध्ये प्रा. बोरनारे यांच्या विरोधात दिनेश परदेशी आदींना ठाकरे गटात प्रवेश देण्यात आला. निवडणुकीच्या तोंडावर बीड, परभणी, धाराशिव, लातूर, जालना या मतदारसंघातून शरद पवार यांना भेटून येणा-यांची संख्या वाढली आहे. सत्ता असल्यामुळे आरक्षण देणे तुमच्या हातात होते. आता विधानसभेचे मतदान आमच्या हातात आहे.

## न्यायदेवतेच्या डोळ्यावरील पट्टी उघडली; आता नवीन मूर्ती समोर आली

नवी दिल्ली - तुम्ही अनेक सिनेमात कोर्टाच्या चित्रिकरणात डोळ्यावर पट्टी बांधलेली न्याय देवतेची मूर्ती पाहिलेली आहे. परंतु आता भारतात न्याय देवतेचे डोळे उघडले आहेत. सुप्रीम कोर्टाने लेडी ऑफ जस्टिस म्हणजे न्यायदेवीची नवीन मूर्ती समोर आणली आहे.

या मूर्तीच्या डोळ्यावरील पट्टी हटवण्यात आली आहे. कायद्याच्या डोळ्यावर पट्टी बांधल्याने त्याला काही दिसत नाही असं चित्र निर्माण होत होते, ते बदलण्यासाठी आता नवीन मूर्ती आणली आहे. ही मूर्ती सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांच्या लायब्रेरीत लावण्यात आली आहे.

मिडिया रिपोर्टनुसार, ही नवी मूर्ती सरन्यायाधीश डी.वाय चंद्रचूड यांनी ऑर्डर देऊन बनवली आहे. यामागचा हेतू म्हणजे आता देशात कायदा आंधळा नाही किंवा शिक्षेचे प्रतिक नाही. न्यायाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या कोर्टात ठेवलेली ही मूर्ती लेडी ऑफ जस्टीस नावाने ओळखली जात होती. न्याय देवतेची आतापर्यंत ही प्रतिमा सगळीकडे वापरण्यात येत होती. त्यात डोळ्यावर काळ्या रंगाची पट्टी बांधलेली दिसायची, जुन्या मूर्तीमध्ये एका हातात तराजू आणि दुसऱ्या हातात तलवार होती. इंग्रजांच्या काळापासून ही परंपरा सुरू होती ती आता बदलायला हवी, कायदा कधीही अंध नसतो. तो सर्वांना समान पाहतो.

काय आहे नवीन मूर्तीमध्ये खास?

न्याय देवतेची नवीन मूर्ती पूर्ण सफेद रंगाची आहे.

प्रतिमेत न्याय देवतेला भारतीय वेशभुषेत दाखवण्यात आलं, त्यात प्रामुख्याने साडी दिसते. डोक्यावर सुंदर मुकूट आहे, कपाळावर टिकली, कानात आणि गळ्यात पारंपारिक आभूषण आहेत

न्याय देवतेच्या एका हातात तराजू आणि दुसऱ्या हातात संविधान पकडल्याचं दाखवण्यात आलं आहे.

दरम्यान, अलीकडेच भारताने ब्रिटीशकालीन लागू असलेले इंडियन पीनल कोड कायद्यात बदल करून भारतीय न्याय संहिता कायदा लागू केला होता. लेडी ऑफ जस्टीस मूर्तीमध्ये बदल करणे याचाच एक भाग मानलं जाते. नव्या मूर्तीत एका हातात संविधान आहे, तलवार नाही. न्याय संविधानानुसार दिला जातो हा संदेश देशाला मिळायला हवा. तलवार हिंसेचे प्रतिक आहे, परंतु कोर्ट संविधानातील कायद्यावर चालते.




## संपादकीय....

# भैय्याजींचे समाजचिंतन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी यांनी सामाजिक भेदभावाच्या संदर्भात जे चिंतन केले आहे त्याचे वृत्त नुकतेच प्रसारित झाले आहे. भेदभाव असणारा समाज नष्ट होतो, त्यामुळे भेदभाव करू नका असा या चिंतनाचा थोडक्यात निष्कर्ष आहे. पण त्याचा तपशील नीट वाचल्यानंतर आणि अँगल लक्षात घेतल्यानंतर असे लक्षात येते की, त्यांना हिंदूधर्मातील जातिभेद नाहीसा व्हावा असे सांगायचे असावे. त्याचे कारण असे की त्यांनी जे संदर्भ दिले आहेत त्यात हरिद्वारचे मंदिर, बारा ज्योतिर्लिंगे आणि देशातील ५१ शक्तिपीठे यांचा दाखला देत ही सगळी स्थळे कोणत्या जातीची आहेत का, अशी विचारणा केली आहे. हिंदूधर्मात जातिभेद नसावा अशी सगळ्यांचीच धारणा आहे. पण त्यात अलीकडे जातनिहाय जनगणनेचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाचा मुद्दा बनवला गेला आहे.राजकारणातही तो एका हत्यारासारखा वापरला जात आहे. भारतीय जनता पक्षाने आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अखिल हिंदू समाज धर्माच्या झेंड्याखाली एकत्र यावा यासाठी मोठा प्रयत्न केला. त्यामध्ये त्यांचा राजकीय लाभ उठवण्याचाही हेतू लपलेला नाही. मुख्य म्हणजे धर्माच्या नावाने त्यांना मोठे राजकीय यशही मिळताना दिसत आहे. या यशाला सुरूंग लावण्यासाठी आणि हिंदूधर्म पुन्हा जातीपातीत विखुरला जावा यासाठीच काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी जातीनिहाय जनगणनेचा आग्रह धरला आहे, अशी भाजप आणि संघाच्या लोकांची धारणा झाली आहे. त्यामुळे एकूणच हा विषय सध्या हॉट टॉपिक बनला आहे.या पार्श्वभूमीवर भेदभाव नसणारा समाज देशात निर्माण करण्याची गरज आहे, असा युक्तिवाद भैय्याजी करत आहेत. वर नमूद केल्याप्रमाणे त्यांना केवळ हिंदूधर्मातील भेदभाव समाजात असता कामा नये असेच अभिप्रेत असावे, असे दिसते. पण मुख्य मुद्दा असा आहे की, या देशात धार्मिक आधारावर जो भेदभाव निर्माण केला जातो आहे त्यातून देशातील समाजमन मोठ्या प्रमाणात अस्वस्थ झालेले दिसत आहे, याची चिंता भैय्याजींना आहे काय, हेही त्यांना विचारावे लागेल. कारण त्यांनी केलेल्या चिंतनाचे जे वृत्त प्रसारित झाले आहे त्यात धार्मिक एकोपा असा स्पष्ट उल्लेख कुठेही दिसत नाही. मग हा सगळा विषय राजकीय पक्षांच्या अजेंडांच्या दिशेने जाताना दिसतो.भारतीय जनता पक्षाला हिंदूचा एकोपा साधून राजकीय हित साधायचे असेल तर, तो त्यांचा डाव हाणून पाडण्यासाठी मग जातनिहाय जनगणनेचा मुद्दा काँग्रेसला उचलून धरावा लागतो. म्हणजे दोन्ही बाजूकडील त्यांच्या युक्तिवादामागे कोणते ना कोणते राजकीय हित दडलेले आहे, हे सहज लक्षात येते. भैय्याजी जोशी यांना जर भेदभाव नसणारा समाज अपेक्षित नसेल, तर त्यात धार्मिक भेदभावालाही थारा असता कामा नये, असा मुद्दा अंतर्भूत करणे अपेक्षित होते, पण तो त्यांनी मांडलेला दिसत नाही.उलट आज भाजप आणि संघाचे लोक अत्यंत टोकाच्या पद्धतीने मुस्लीम समाजाविषयी गरळ ओकताना दिसत आहेत. त्यामुळे सुमारे १६ कोटींच्या संख्येत असलेला हा मुस्लीम समाज मनातून अशांत आणि असुरक्षित बनला आहे. त्यांना दिलासा वाटावा किंवा विश्वासाचे वातावरण त्यांच्यात निर्माण व्हावे असे कोणतेच प्रयत्न सध्याच्या राजवटीत होताना दिसत नाहीत. ही अस्थिर परिस्थिती दिवसेंदिवस आणखी बिकट कशी होईल असाच प्रयत्न निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरही होताना दिसतो. धार्मिक ध्रुवीकरणाचा हा फंडा हमखास राजकीय यश देणारा फंडा असल्याची धारणा भाजप आणि संघाच्या समर्थकांमध्ये झाली असल्याने निवडणुका आल्या की अशा समर्थकांना चांगलाच चेव चढतो.त्यातून अनेक भागांमध्ये तणावाची स्थिती किंवा दंगलीची स्थिती निर्माण झाल्याचे आपण अनेक वेळा पाहिले आहे. ही स्थिती टाळण्यासाठी संघ, भाजपचे लोक काय प्रयत्न करीत आहेत किंवा अल्पसंख्याकांना विश्वास वाटेल असे वातावरण निर्माण करण्यासाठी ते काय योगदान देत आहेत हेही पाहावे लागेल. नुसतेच भेदभाव असणारा समाज नष्ट होतो असे सांगून केवळ हिंदूधर्मातील जाती–जातींमध्ये एकोपा साधण्याच्या प्रयत्नाच्याही बाहेर जाऊन सर्वच समाजामध्ये आणि जातींमध्येही एकोपा साधण्याचा प्रयत्न फार गांभीर्याने हाती घेण्याची गरज आहे. भैय्याजी जोशी यांनी हे चिंतन करताना पुरुषसूक्तात हजार मस्तकी, हजार हात आणि हजार पायांचा उल्लेख असलेल्या व्यक्तीचे वर्णन केले आहे.पुरुषसूक्तातील ही व्यक्ती म्हणजे समाजपुरुष आहे, तो राष्ट्रपुरुष आहे, हा सर्व एकच भाग आहे, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांचे हे विचार अगदी रास्त असून त्यांनी आता जातीजातींमध्ये एकोपा साधण्याबरोबरच आपल्या विचारसरणीच्या लोकांमधून धार्मिक विद्वेष पसरणार नाही अशीही अपेक्षा व्यक्त केली पाहिजे. किंबहुना त्यासाठी पुढाकाराने त्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. अलीकडच्या काळात सामाजिक बहिष्कार घालण्याची भाषा अनेक वेळा ऐकू येते. विशेषतः हिंदू धार्मिक सणाच्या काळात कोणाकडून वस्तू खरेदी करा आणि कोणाकडून खरेदी करू नका याचे आवाहन करणार्या अनेक पोस्ट सोशल मीडियात पाहायला मिळतात. अशा पोस्ट मनाला वेदना देणार्या असतात. एका समाजाने दुसर्या समाजावर सामाजिक बहिष्कार टाकला तर त्याचे होणारे आर्थिक परिणाम त्या समाजाला किती विदारक स्थितीला नेऊन ठेवतील याची कल्पना करता येत नाही आणि त्यातून पुढे भविष्यात जे काही रणकंदन माजेल त्याचाही अंदाज लावता येत नाही. हा सगळा सामाजिक सलोखा बिघडवून सामाजिक स्थिती विध्वंसाच्या दिशेने नेण्याचा जो प्रयत्न सुरू आहे त्याला आता सत्ताधार्यांबरोबरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जबाबदार पदाधिकार्यांनीही पायबंध घातला पाहिजे.

# संपण्यापूर्वी पाहू

आमच्याकडे पाऊस संपता संपेना झालाय. खरं तर 'ऑक्टोबर हीट' अनुभवायची आहे; पण अधूनमधून 'ऑक्टोबर शॉवर'मध्ये भिजावं लागतंय. या दिवसात छत्री घेऊन घराबाहेर पडावं तरी लोक वेड्यात काढतील, ही भीती! पावसाळा ऑङ्गिशिअली सप्टेंबरमध्ये संपायला हवा. पण 'परतीचा पाऊस' म्हणून ज्या पावसाकडे बोट दाखवलं, तोसुद्धा जाऊन परत आला. मॉन्सून कुठून कुठे गेला आणि कुठून परत आला, हेच कळेनासं झालंय. तो नैर्ऋत्येकडून येतो आणि सप्टेंबर अखेरीस तिकडेच परत जातो, असं ऐकून होतो.



पण आता मॉन्सूनलाच दिशा कळेनाशा झाल्यात की काय, कोण जाणे! कुणीतरी परवा चेष्टेनं म्हणालं, 'आचारसंहिता लागली की पाऊस थांबेल.' इतकी टोकाची चेष्टा सहन करूनसुद्धा पावसाने अजून मुक्काम हलवलेला नाही. खरं तर आम्हाला कुठेतरी ङ्गिरायला जायचंय. पण हा पाऊस प्लॅनिंगच करू देईना. यंदा कुठेतरी लांब जायचं मनात आहे. विमानाने जायचं असा पोरांचा हट्ट आहे.

सौभाग्यवतींना कुठल्यातरी 'अननोन डेस्टिनेशन'ला जाण्याची इच्छा आहे. पण पावसामुळे 'डेस्टिनेशन' लांबच, महिनासुद्धा ठरेना मग तारीख कशी ठरणार?आजकाल आपल्या आवडीपेक्षा 'ट्रेन्ड' महत्त्वाचा असल्यामुळं आमच्या घरात 'लास्ट चान्स टूरिजम'ची चर्चा रंगलीये. याबाबत पोरांकडून अधिक माहिती घेतली असता असं समजलं, की जागतिक हवामान बदलामुळं जी ठिकाणं लवकरच नष्ट होणारंयत, जिथे परत जाताच येणार नाही, तिथे ङ्गिरून यायचं..! ही कल्पना आम्हाला जाम आवडली. मग या नव्या 'ट्रेन्ड'ची अधिक माहिती घेतली. एखादं ठिकाण 'संपलं' म्हणून गळा काढत बसण्याची वेळ आपल्यावर येऊ नये. उलट ते संपण्यापूर्वी आपण पाहिलं, याचा आनंद आपल्या चेहर्यावर असावा, त्या ठिकाणचे (आपले) ङ्गोटो आपल्याकडे असावेत, ते आपण लोकांना दाखवावेत आणि अशा प्रकारे त्या इतिहासजमा होणार्या ठिकाणासोबत आपण इतिहासात अजरामर व्हावं, असा 'सुविचार' यामागे आहे, अशी माहिती मिळाली.

मग तर एक्साइटमेन्ट आणखी वाढली. जगभरात वाढत चाललेला हा सद्विचार आपणही अंमलात आणला पाहिजे, जी बेटं काही वर्षांनी पाण्याखाली जाणार आहेत किंवा ज्या हिमनद्या आणि हिमशिखरं वितळून नष्ट होणार आहेत, अशा सर्व ठिकाणांना तातडीनं भेटी द्याव्यात, या ट्रिपसाठी खास हाय क्वालिटी कॅमेरे असलेले मोबाइल खरेदी करावेत आणि ही ठिकाणं 'ङ्गोनभरून' पाहावीत असं वाटू लागलं. 'वर्ल्ड ट्रॅव्हल अँड टूरिजम कौन्सिल' नावाची एक संस्था आहे म्हणे! तिच्या म्हणण्यानुसार, हरितगृह वायूंचं जवळजवळ दहा टक्के उत्सर्जन आमच्या प्रवासामुळे होतं. त्याला आम्ही काय करणार? आधी उरलेल्या नव्वद टक्क्यांबद्दल बोला!

कुणी आमची चूक सांगितली की दुसरीकडे बोट दाखवून विषय बदलण्याची कला आम्हाला आता चांगली अवगत झालीये. अहो, जगातल्या हिमनद्या या शतकाच्या अखेरीस ऐंशी टक्के आकसणार आहेत. नव्वद टक्के प्रवाळाचे खडक हळूहळू नष्ट होणार आहेत. अशा वेळी आमचं दहा टक्के प्रदूषण तुम्हाला दिसतं होय! आमच्या खिशात पैसा आहे. आम्हाला प्रवासाची आवड आहे. आम्ही तो करणार. जे नष्ट होणार आहे, ते बघणार..! पण हा पाऊसच थांबेना. त्याचंही 'लास्ट चान्स टूरिजम' चाललंय की काय?

# कोजागिरीचं चांदणं

कोजागिरी पौर्णिमेला जागरण करण्याची पद्धत आहे. या दिवशी रात्री लक्ष्मी 'को जगार्ती' असे विचारत असते. जेथे लोक जागे असतात तेथे ती प्रवेश करते. त्यांना समृद्धी देते. आश्विन पौर्णिमा म्हणजेच कोजागिरी पौर्णिमा आज साजरी केली जात आहे. नवरात्र नुकतेच संपलेले असते. यादिवशी नभांगणातील पूर्ण चंद्राच्या शीतल प्रकाशानं अवघी सृष्टी तेजोमय झालेली असते. आकाशभर चंद्र–किरणांचा आणि चांदण्यांचा सडा पडलेला असतो. स्वच्छ, नितळ प्रकाशात अवघी धरती न्हाऊन निघत असते. चंद्राच्या या किरणशलाका अतिशय अल्हाददायक आणि मोहक असतात. यादिवशी लक्ष्मी, कुबेर आणि इंद्र यांची एकत्रित पूजा करण्याचीही पद्धत आहे. पाटावर प्रतिकात्मक चंद्र काढायचा आणि लक्ष्मी, कुबेर म्हणून सुपारी ठेवायची, तर इंद्र म्हणून तांब्याचा कलशात आंब्याची पाने ठेवावीत. त्यांची मनोभावे पूजा करावी. या पूजेमुळे घरात अक्षय लक्ष्मी नांदते, अशी समजूत आहे.

भारताच्या काही भागात लोक या दिवशी उपवास ठेवतात. तांब्यावर अथवा मातीच्या घटावर वस्त्रात झाकलेली लक्ष्मीची प्रतिमा ठेवतात. त्याची पंचोपचार पूजा करतात. त्यानंतर संध्याकाळी चंद्रोदयानंतर सोनं, चांदी अथवा मातीचे १०० दिवे तुपाने भरून पेटवले जातात. खीर करून ती चंद्राच्या प्रकाशात ठेवतात. एक प्रहरानंतर म्हणजे तीन तासानंतर लक्ष्मीला खिरीचा नैवेद्य दाखवतात. मंगल गीत गाऊन रात्री जागरण करतात. अशाप्रकारे दरवर्षी हे व्रत लक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी केले जाते. खानदेशकडील काही भागात या दिवशी गुलाबाईचे पारणे असते व दुसर्या दिवशी विसर्जन असते. अनंत चतुर्दशीच्या दुसर्या दिवशी घराघरातून कुमारिका गुलाबाईची स्थापना करतात. गुलाबाई म्हणजे पार्वती. शंकर, पार्वती आणि गणपती यांची एकत्रित मूर्ती तयार केली जाते. यात भरपूर विविधता असते. कमळावर, नागावर, सिंहासनावर बसवलेली गुलाबाई असे प्रकार असतात. आपल्या इच्छेनुसार मूर्ती आणून घरात तिची स्थापना करायची. कोजागिरी पौर्णिमेपर्यंत म्हणजे महिनाभर मुली एकमेकींच्या घरी जाऊन गुलाबाईंची गाणी म्हणतात. झिम्मा खेळतात, खिरापत वाटतात, पौर्णिमेला याचे पारण करतात.



रात्री सार्याजणी आपापल्या गुलाबाईची मूर्ती घेऊन एके ठिकाणी जमतात. तेथे वेगवेगळी खिरापत प्रसाद म्हणून आणतात. दूध आटवून ते चंद्रप्रकाशात ठेवतात आणि रात्रभर गाणी, खेळ खेळतात. मग खिरापत खाऊन आणि दूध पिऊन आपापल्या घरी जातात. दुसर्या दिवशी मूर्तीचे विसर्जन करतात. गुलाबाई म्हणजे पार्वती महिनाभर माहेरी आलेली असते, असे मानतात. तिला रोज वेगवेगळे नैवेद्य दाखवतात. हा संपूर्ण महिना घराघरातून कुमारिकांचा चिवचिवाट ऐकायला मिळत असतो.

अशा प्रकारे कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. पद्धती वेगळ्या असल्या तरी कोणत्याही रूपात देवीची पूजा करणे हाच या मागचा हेतू आहे. कोजागिरी पौर्णिमा म्हटली की आठवते ती शिवाजी महाराजांच्या काळातील हिरकणीची गोष्ट. तो दिवस कोजागिरीचा होता. महाराजांनी रायगडाच्या सभोवतालच्या गावातील लोकांना शक्य तेवढे दूध गडावर पोचवण्याची आज्ञा दिली होती. गडपायथ्याच्या गावातील गवळणी दूध पोचवायला गडावर पोचल्या.

हिरकणी आपल्या तान्हुल्याला घरी निजवून गडावर आली होती. दूध दिल्यानंतर गडावरचे वैभव बघताना तिला परतायचे भान राहिले नाही. परतीचा रस्ता धरला तेव्हा गडाचे दरवाजे बंद झाले होते. नियमानुसार ते सूर्योदयाच्या वेळीच उघडणार होते. सह्याद्रीच्या या कन्येने आपल्या मातृत्वाखातर गडाच्या अत्यंत अवघड कड्यावरून खाली उतरत आणि पळत आपल्या तान्हुल्या जवळ गेली त्याला छातीशी धरले. महाराजांना ही गोष्ट दुसर्या दिवशी समजल्यावर त्यांनी हिरकणीला बोलावून तिचा सत्कार केला आणि कड्याला तिचे नाव दिले. कोजागिरीची ही आठवण इतिहासाच्या पानांवर कायमची उमटली गेली आहे.

महाराष्ट्रातील पुणे व त्या जवळच्या भागात नवरात्रीपासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत भोंडला साजरा केला जातो. पाटावर हत्ती काढून त्याभोवती स्त्रिया, मुली ङ्गेर धरतात. भोंडल्याची गाणी म्हणतात. खिरापत वाटतात. कोजागिरी म्हणजे हमखास जागरण, मनसोक्त गप्पा आणि सोबतीला मसालेदार दुधाचा आनंद. या दिवसात पावसाळा संपून गुलाबी थंडीला सुरुवात झालेली असते. या दिवसांत अगस्त तार्याचा उदय होतो. या तार्याच्या किरणस्पर्शाने तळी, नद्या, विहिरींचं पाणी शुद्ध होऊन पिण्यायोग्य होतं, असा समज आहे. या दिवसांत काय करावं हे आपल्या परंपरेत सांगण्यात आलं आहे. शरद ऋतूमध्ये पित्ताचा त्रास होतो. तो होऊ नये म्हणून सुवासिक जल, थंड पेयं घ्यावीत, चंद्रप्रकाशात बसावं, मोत्यांच्या माळा धारण कराव्यात असं सांगण्यात आलं आहे. यातूनच या पौर्णिमेच्या रात्री शीतल दूध घेण्याची परंपरा सुरू झाली असावी.

अलीकडच्या काळात टीव्हीसह घरातच मनोरंजनाची अनेक साधनं उपलब्ध आहेत. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत जागरण होतं. पण पूर्वी अशी परिस्थिती नव्हती. त्यामुळेच कोजागिरीच्या निमित्ताने रात्री उशिरापर्यंत जागण्याची पद्धत रूढ झाली. या रात्री लक्ष्मी प्रत्येक घरात ङ्गिरते आणि ती 'को जागर्ती' म्हणजेच 'कोण जागं आहे?' असा प्रश्न विचारते. जागं असणार्यांना तिचा आशीर्वाद मिळतो, अशी कथा आहे. हे जागं असणं म्हणजे आपल्यामध्ये जागृती असणं असा अर्थ घ्यायला हवा. केवळ स्वत: पुरताच विचार न करता समाजातील इतर घटकांचाही विचार झाला पाहिजे, त्यांच्या सुखदु:खात आपणही सामील असलं पाहिजे, आपल्या मनामध्ये विविध गोष्टींबद्दल जागृती असली पाहिजे हा याचा खरा अर्थ.

मनाची जागृती झाल्याशिवाय आपल्याला पुढे जाता येत नाही हे समजून घ्यायला हवं. त्यातूनच कोजागिरीच्या रात्री जागरण करण्याची पद्धत रूढ झाली असावी. हे जागरण म्हणजे जागृती. ती आपल्याही मनामध्ये असायला हवी, हा कोजागिरीचा खरा अर्थ. समाजातील इतर प्रश्नांबरोबरच या दिवसात होणार्या ऋतुबदलाबद्दल जागृती असायला हवी. कोजागिरी म्हणजे केवळ आपली झोप सोडून केलेलं जागरण नसून आपल्या ऋतूबदलांची, बाहेरच्या वातावरणात झालेल्या ङ्गरकाची नोंद कोणी घेतली आहे का हे पाहणं म्हणजे खरी जागृती. ऋतूबदलाप्रमाणे आपल्या आहारात आणि दिनचर्येत काही बदल करणं आवश्यक असतं. मसाले, तिखट पदार्थ आहारातून कमी करणं या दिवसांत आवश्यक असतं. कोजागिरीच्या रात्री दूध पिण्याची पद्धत आपल्याकडे आहे. त्यामागेही एक विशिष्ट कारण आहे. या दिवसांत हवामानात बरेच बदल घडून येत असतात. या दिवसांत हिवाळा सुरू होतो. दिवसा गरम होतं आणि रात्री थंडी पडते. दूध पिल्यामुळे पित्तप्रकोप कमी होतो.

या दिवशी काही घरांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं, काव्य वाचनाच्या मैङ्गिली रंगतात. या निमित्ताने आपल्यातील प्रतिभाही जागृत होते. कोजागिरी साजरी करण्यामागे असे अनेक अर्थ दडलेले आहेत. त्याची आपल्याला माहिती असायला हवी. कोजागिरी साजरी करण्याचा प्रकार कोणताही असला तरी या दिवसाचे चंद्राचे शीतल चांदणे प्रत्येकाला अनुभवायचे असते, या चंदेरी प्रकाशात न्हाऊन निघायचे असते, हेच खरे.

# हार्ट अटॅक येण्याआधी शरीरात दिसतात ‘हे’ बदल; सतर्क राहा, वेळीच वाचेल तुमचा जीव !

हृदयविकार हे जगभरातील मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे, ज्याचा धोका गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढताना दिसत आहे. सर्व वयोगटातील लोकांनी हृदयाच्या आरोग्याबाबत सजग राहणे गरजेचे आहे. हृदयविकार आणि हृदयविकाराचा झटका तरुणांमध्येही दिसून येत आहे, हे निश्चितपणे मोठ्या धोक्याचे लक्षण आहे. जीवनशैली आणि आहारातील गडबडीमुळे हृदयाच्या आरोग्यावर सर्वाधिक परिणाम होत आहे. हृदयविकार येण्यापूर्वी काही लक्षणं दिसून येतात पण ही लक्षणं सामान्य वाटली त्याकडे दुर्लक्ष करू नका. आज आपण याच काही सामान्य दिसणाऱ्या लक्षणांकडे एक नजर टाकणार आहोत. – हृदयविकार हा गंभीर स्वरुपाचा आजार आहे. बदलती जीवनशैली, व्यायाम आणि पोषक आहाराचा अभाव, वाढते ताण–तणाव आदी कारणांमुळे हृदयविकार होण्याची शक्यता अधिक असते. हार्ट अटॅक अर्थात हृदयविकाराचा झटका हा जीवघेणा मानला जातो. हृदयाशी संबंधित कोणत्याही समस्येकडं वेळेवर लक्ष दिलं नाही, तर हार्ट अटॅकची शक्यता वाढते. – खांदे किंवा मान दुखणं हे हार्ट अटॅक येण्यापूर्वीचं सामान्य लक्षण आहे. अनेकदा मान आणि खांद्यांच्या आसपास वेदना जाणवतात. छाती दुखण्यासह खांदे किंवा मानेजवळचा भाग दुखत असेल किंवा छातीपेक्षा खांदा आणि मानेत वेदना जास्त असतील तर अशी स्थिती सामान्य नक्कीच नसते. त्यासाठी तुम्ही तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. – मळमळणं, उलट्या होणं ही देखील सामान्य समस्या आहे. सर्वसामान्यपणे पोटाशी संबंधित आजारामुळे ही लक्षणं दिसतात. पण काही वेळा हृदयविकारामुळे अस्वस्थ वाटणं, मळमळ किंवा उलटी होणं अशी लक्षणं दिसतात. काही लोकांमध्ये हार्ट अटॅक येण्यापूर्वी उलटीसारखे संकेत जाणवू लागतात.– हार्ट अटॅक येण्यापूर्वी तुम्हाला छातीत दुखणं तसेच दम लागणं यासारख्या समस्या जाणवू शकतात. जेव्हा हृदय पुरेशा प्रमाणात शरीरातील विविध अवयवांना रक्तपुरवठा करू शकत नाही, तेव्हा अवयवांमधील ऑक्सिजनचं प्रमाण कमी होऊ लागते. ऑक्सिजनची कमतरता जाणवू लागताच आपलं शरीर त्यावर प्रतिक्रिया देतं आणि अधिक ऑक्सिजन घेण्यासाठी श्वासोच्छवासाचा वेग वाढवतं. या क्रियेमुळे दम लागतो.– जर तुम्हाला छातीत दुखण्यासह चक्कर येत असेल तर हे संकेत चांगले नाहीत. अशा वेळी तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधावा. कारण हार्ट अटॅकपूर्वी हृदयाच्या पंपिंग क्षमतेवर परिणाम होतो आणि मेंदुपर्यंत रक्तपुरवठा होत नाही. त्यामुळे काही वेळा चक्कर येणं, बेशुद्ध पडणं अशी लक्षणं दिसतात. अशी कोणतेही लक्षणं दिसून आली तर तातडीने आरोग्य डॉक्तरांचा सल्ला घ्या. हृदय निरोगी ठेवण्यासाठी काय करावे? हृदयविकार टाळण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आहारातील पोषणमूल्यांची काळजी घेणे. आहारात फळे आणि भाज्या, संपूर्ण धान्य, नट, मासे, पोल्ट्री यांचा समावेश आरोग्यासाठी खूप फायदेशीर असल्याचे आढळून आले आहे. हृदय निरोगी ठेवण्यासाठी काय खावे, कोणत्या पदार्थांचे सेवन करू नये किंवा कमी करू नये हे महत्त्वाचे आहे. लाल आणि प्रक्रिया केलेले मांस, कार्बोहायड्रेट्स, जोडलेली साखर आणि सोडियम असलेले पदार्थ तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात.व्हिटॅमिन डीची कमतरता :ज्या लोकांमध्ये व्हिटॅमिन डीची कमतरता आहे त्यांना हृदयविकाराचा झटका, कंजेस्टिव्ह हार्ट फेल्युअर, परिधीय धमनी रोग आणि स्ट्रोक यासारख्या समस्या विकसित होण्याचा धोका जास्त असतो. या स्थितीमुळे उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचा धोका देखील वाढू शकतो, ज्यामुळे हृदयाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. आहारात व्हिटॅमिन डीचे पुरेसे प्रमाण सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. व्हिटॅमिन बी–१२ कडे लक्ष द्या : व्हिटॅमिन डी प्रमाणेच, हृदय निरोगी ठेवण्यासाठी व्हिटॅमिन बी १२ देखील आवश्यक आहे. या व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे कोरोनरी रोग, मायोकार्डियल इन्फेक्शन, स्ट्रोक आणि इतर रक्ताभिसरण आरोग्य समस्यांचा धोका वाढू शकतो. व्हिटॅमिन बी–१२ ची कमतरता शरीरातील इतर अनेक प्रकारच्या धोक्यांमध्ये एक घटक असू शकते, हे जीवनसत्व असलेल्या गोष्टींचा आहारात समावेश करणे आवश्यक आहे. फोलेटची कमतरता : शरीरात फोलेटची कमतरता हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग कार्डिओ–व्हॅस्क्युलर डिसीजचा धोका वाढवू शकते. कार्डिओ–व्हॅस्क्युलर डिसीज म्हणजे हृदय किंवा रक्तवाहिन्यांचे आजार. फोलेटच्या कमतरतेच्या बाबतीत, शरीरातील लोहाचे प्रमाण कमी होऊ लागते ज्यामुळे तुम्हाला अनेक प्रकारच्या आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

## विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रात झेप घ्यावी –डॉ.हनुमंत सौदागर विभागीय कुस्ती स्पर्धेत विजयी आरती भांडवलकरचा सत्कार

### स्वामी विवेकानंद विद्यालयाचे यश

केज/प्रतिनिधी :– तालुक्यातील सोनीजवळा येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी आरती सुनील भांडवलकर हिने कुस्ती स्पर्धेत विभागीय स्तरावर विजय मिळवला व राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी ती पात्र झाली आहे. या यशाबद्दल स्वामी विवेकानंद विद्यालय व युनिक फाउंडेशन च्यावतीने सन्मान चिन्ह सन्मानपत्र आणि रोख पारितोषिक देऊन डॉ.हनुमंत सौदागर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष रतन भांडवलकर, प्रमुख पाहुणे डॉ. हनुमंत सौदागर, सचिव शंकर पाखरे, संस्थेचे उपाध्यक्ष शंकरराव ससाने,मुख्याध्यापक मंगेश गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ.सौदागर म्हणाले विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रामध्ये जिद्दीने प्रयत्न करावेत यश नक्की मिळते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आहे शिक्षक आणि पालकांनी त्यांना भक्कम साथ दिली पाहिजे. कुस्ती स्पर्धेत जिल्हास्तरावर विजयी झालेल्या पूजा भांडवलकर चा आहे सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व सहशिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तूप किंवा मावाच नाही, तर गुळातही होऊ शकते भेसळ

जर तुम्ही तुमचे आरोग्य सुधारण्यासाठी साखरेऐवजी गुळाचा वापर करत असाल तर आधी त्याची शुद्धता तपासायला शिका. भेसळ केलेला गुळ तुमच्या आरोग्याला हानी पोहोचवू शकतो.



आजकाल प्रत्येक खाद्यपदार्थात भेसळीची समस्या वाढत आहे. मग ते तूप, तेल, मिठाई किंवा गूळ असो. नफा कमावण्यासाठी दुकानदार या सर्व गोष्टींमध्ये भेसळ करत आहेत. साधारणपणे आपण गुळाला आरोग्यदायी मानतो आणि त्याचा आपल्या आरोग्याला फायदा होईल या विचाराने त्याचा आहारात समावेश करतो, पण भेसळयुक्त गूळ आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. प्रत्यक्षात बाजारात विकला जाणारा गूळ हा अनेकदा केमिकल किंवा स्वस्त साखरेचा वापर करून तयार केला जातो, ज्यामुळे तो चवीला गोड होतो, पण त्याच्या शुद्धतेबाबत प्रश्न उपस्थित केले जातात. त्यामुळे गूळ खरेदी करण्यापूर्वी त्याची शुद्धता तपासणे अत्यंत आवश्यक आहे. येथे आम्ही तुम्हाला असे सोपे उपाय सांगत आहोत ज्याद्वारे तुम्ही घरच्या घरी गुळातील भेसळ ओळखू शकता आणि आजारांपासून दूर राहू शकता. भेसळ केलेला गूळ कसा ओळखायचा पाण्यात टाकून तपासा सर्वप्रथम एका ग्लासमध्ये पाणी घेऊन त्यात गुळाचा छोटा तुकडा टाका. शुद्ध गूळ पाण्यात पूर्णपणे विरघळेल, परंतु भेसळयुक्त गूळ स्थिर होईल.

रंगाने ओळखा शुद्ध गुळाचा रंग गडद तपकिरी किंवा हलका पिवळा असतो. तर भेसळयुक्त गुळाचा रंग चमकदार आणि गडद पिवळा असू शकतो. त्यामुळे गुळाचा रंग खूप उजळ असेल तर सावधगिरीने खरेदी करा.

चवीला कडूपणा शुद्ध गूळ गोड आणि नैसर्गिक असतो, तर भेसळयुक्त गुळाची चव कधी कधी कडू किंवा विचित्र असू शकते. त्यामुळे खरेदी करण्यापूर्वी त्याचा आस्वाद घ्या आणि विचित्र वाटल्यास खरेदी टाळा.

चिकट किंवा ओला गूळ चिकट किंवा खूप ओला गुळ यात भेसळ होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे फक्त कडक गूळ घेतल्यास बरे होईल. या सोप्या पद्धतींनी तुम्ही घरच्या घरी गुळाची शुद्धता तपासू शकता. गरम करा खरा गूळ गरम केल्यावर तो हळूहळू वितळतो आणि घट्ट सरबतसारखा बनतो. जो चिकट आहे आणि सहज वाहत नाही. तर बनावट गूळ गरम केल्यावर तो वेगाने वितळतो आणि पाण्यासारखा पातळ होतो.

## घरी आलेल्या पाहुण्यांसाठी झटपट बनवा क्रिस्पी पनीर बाईट्स, चव अशी की सर्वच होतील खुश

अनेकदा अचानक आपल्या घरी पाहुणे आले की त्यांच्यासाठी काय बनवावे ते आपल्याला सुचत नाही. अशा परिस्थितीत आपण एका झटपट रेसिपीच्या शोधात असतो. तुम्हीही एका झटपट आणि स्वादिष्ट रेसिपीच्या शोधात असाल तर आजची ही बातमी तुमच्या फायद्याची ठरणार आहे. अनेकांना पनीर हा पदार्थ खायला फार आवडतो. यापासून वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. जसे की, पनीर टिक्का, पनीर पराठा, मटार पनीर मात्र आज आम्ही तुमच्यासोबत पनीरची एक चविष्ट आणि कुरकुरीत अशी रेसिपी शेअर करत आहोत.



आजच्या आपल्या रेसिपीचे नाव आहे क्रिस्पी पनीर बाईट्स. स्नॅक्ससाठी एक उत्तम पर्याय आहे. मुख्य म्हणजे, ही रेसिपी फार कमी साहित्यापासून आणि कमी वेळेत बनून तयार होते. तुम्ही या रेसिपीने सर्वांचे मन जिंकू शकता. ही रेसिपी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच फार आवडेल. जाणून घ्या यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य २०० ग्रॅम पनीर १ चमचा लाल मिरची पावडर ट चमचा मीठ ट चमचा धने पावडर आले–लसूण पेस्ट कॉर्नफ्लोर मैदा कृती क्रिस्पी पनीर बाईट्स बनवण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात पनीर घ्या आणि याचे चौकोनी तुकडे करा मग यात १ चमचा लाल मिरची पावडर, ट चमचा मीठ, ट चमचा गरम मसाला, ट चमचा धने पावडर आणि आले–लसूण पेस्ट घाला सर्व साहित्य नीट एकजीव करा आणि १० मिनटे बाजूला ठेवून द्या आता एक दुसरे भांडे घ्या आणि यात २ चमचे कॉर्नफ्लोर, १ चमचा मैदा आणि पाणी टाकून एक स्लरी तयार करा यांनतर गॅसवर एक कढई ठेवा आणि यात तेल टाका तेल तापले की मॅरिनेटेड पनीर स्लरीमध्ये बुडवा स्लरीमध्ये बुडवल्यानंतर यांना ब्रेड क्रम्समध्ये कोट करा आणि तेलात टाका मध्यम आचेवर हे पनीरचे तुकडे छान कुरकुरीत होईपर्यंत तळा आणि प्लेट मध्ये काढा अशाप्रकारे तुमचे क्रिस्पी पनीर बाईट्स तयार होईल तयार क्रिस्पी पनीर बाईट्स तुम्ही सॉससोबत खाण्यासाठी सर्व्ह करा

## गॅसवर ठेवल्यावर गोल फुगते रोटी, तासनतास ठेवून होत नाही कडक

बऱ्याचदा लोक रोट्या साठवून ठेवतात नंतर लक्षात येते की, रोट्या कडक झाल्या आहेत. बऱ्याच वेळा रोटी गोल फुगत नाही आणि कडकही होते. आज आम्ही तुम्हाला एक अशी युक्ती सांगणार आहोत ज्याद्वारे तुमची प्रत्येक रोटी गॅसवर ठेवताच फुगून जाईल. भारतीय जेवणात रोटी ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. उत्तर भारतात प्रत्येकाच्या घरी दिवसातून दोनदा रोटी तयार केली जाते. तरीही अनेकांना चांगली रोटी कशी बनवायची हे माहीत नाही. रोटी तयार करुन ठेवल्यास कधी कधी कडक होते. काहींची भाकरी उठत नाही तर काहींची भाकरी जळून जाते. अशा परिस्थितीत, आज आम्ही तुम्हाला काही अतिशय मनोरंजक आणि उपयुक्त टिप्स सांगत आहोत ज्याद्वारे तुमची प्रत्येक रोटी गॅसवर ठेवताच फुग्यासारखी फुगून जाईल. अशा प्रकारे फुगवलेली रोटी बनवा पीठ नीट मळल्यावरच रोटी मऊ आणि चांगली बनते. रोटी बनवण्यासाठी प्रथम पीठ मळून घ्या आणि सेट होण्यासाठी किमान १५ मिनिटे ठेवा. रोटीचे पीठ जास्त पातळ किंवा घट्ट नसावे. पीठ सेट करण्यासाठी, प्लेट, कापड किंवा गुंडाळलेल्या पिशवीत ठेवा. यामुळे रोटी बनवण्यासाठी पीठ चांगले सेट होईल. आता पिठाचा गोळा फोडून एक गोल करा. लक्षात ठेवा की, रोटी लाटताना फार कमी कोरडे पीठ वापरू नका. रोटीवर किमान दोनदा कोरडे पीठ लावून ते मोठे करण्यासाठी लाटून घ्या. आता रोटी तव्यावर ठेवा आणि अगदी हलकी शिजल्यावरच उलटा. रोटी दुसऱ्या बाजूने थोडी जास्त बेक करा. जेव्हा तुम्ही रोटी गॅसवर शिजवण्यासाठी ठेवता तेव्हा नेहमी सरळ बाजू ठेवावी, म्हणजे ज्या बाजूने रोटी प्रथम शिजली होती. रोटी गोलाकार गतीने फिरवून आणि अधूनमधून उचलून बेक करा. अशा प्रकारे तुमची प्रत्येक रोटी बॉल सारखी फुगते.

काही लोक मागच्या बाजूने भाजण्यासाठी रोटी ठेवतात त्यामुळे रोटी नीट उठत नाही. रोटी नीट वर येत नाही, साठवल्यावर कडक होते. अशा प्रकारे भाजलेली रोटी बराच काळ मऊ राहते. रोटीला तूप लावून गरम भांड्यात ठेवा. तुमची रोटी दिवसभर मऊ राहील.

## कोजागिरी पौर्णिमेला विकतचा मसाला आणण्यापेक्षा घरीच १० मिनिटांमध्ये बनवा दूध मसाला

कोजागिरी पौर्णिमेला शरद पौर्णिमा असे सुद्धा म्हणतात. या दिवशी चंद्राची पूजा करून तयार केलेल्या दुधात चंद्राचे प्रतिबिंब पहिले जाते. त्यानंतर सगळ्यांना मसाला दूध दिले जाते. नवरात्री उत्सवाच्या तीन किंवा चार दिवसांनंतर कोजागिरी पौर्णिमा साजरी केली जाते. या दिवशी अनेक ठिकाणी रात्री गरबा, दांडिया खेळला जातो. तसेच या दिवशी प्रत्येक घरात मसाला दूध बनवले जाते. मसाला दूध बनवण्यासाठी बाहेर मसाला विकत आणला जातो. पण विकत मिळणारा दूध

बडीशेप पिस्ता केशर अक्रोड सूर्यफुलाच्या बिया भोपळ्याच्या बिया

कृती: दूध मसाला बनवण्यासाठी सर्वप्रथम कढई गरम करण्यासाठी ठेवा. कढई गरम झाल्यानंतर काजू, बदाम आणि पिस्ता वेगवेगळे भाजून घ्या. नंतर त्यात कढईमध्ये बडीशेप, अक्रोड भाजून घ्या. नंतर त्यात भोपळ्याच्या बिया आणि सूर्यफुलाच्या बिया भाजून घ्या.

भाजून घेतलेले सर्व साहित्य थंड होण्यासाठी ठेवा.





मसाला आणण्यापेक्षा तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये दुधाचा मसाला बनवू शकता. घरी बनवलेला मसाला कमीत कमी साहित्यामध्य स्वस्तात मस्त तयार होईल. सर्वच घरांमध्ये सुका मेवा असतोच त्यामुळे तुम्ही दूध मसाला यंदाच्या वर्षी घरीच बनवा. चला तर जाणून घेऊया मसाला दूध बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: काजू बदाम वेलची पावडर जायफळ

थंड झाल्यानंतर मिक्समध्ये टाका.

नंतर त्यात केशराच्या काड्या. ४ वेलची आणि अर्धा तुकडा जायफळ टाकून मिक्सरमधून बारीक वाटून घ्या.

वाटून घेतलेला मसाला बंद डब्यात घट्ट झाकण लावून भरून ठेवा. तयार केलेला मसाला १ महिनाभर व्यवस्थित टिकतो.

# स्तनाच्या कर्करोगासाठी म्हणजे काय आणि ते महत्त्वाचे का आहे?

अर्थात फ्लुरोसेन्स इन सिटू हायब्रिडायझेशन चाचणी ही एक अनुवांशिक चाचणी आहे जी कर्करोगाच्या पेशींमधील विशिष्ट जनुकात काही बदल झाले आहेत का हे पाहण्यासाठी करण्यात येते. याचा वापर सामान्यतः स्तनाच्या कर्करोगाच्या निदानामध्ये एचईआर२ जनुक तपासण्यासाठी केला जातो. एचईआर२ म्हणजे ह्युमन एपिडर्मल ग्रोथ फॅक्टर रिसेप्टर२, हे एक असे प्रोटीन आहे जे कर्करोगाच्या पेशी वाढण्यास मदत करते.

सुमारे २०% स्तनाच्या कर्करोगांमध्ये, एचईआर२ जनुक जास्त प्रमाणात दिसून येते, म्हणजेच जनुकाच्या अतिरिक्त प्रती असतात, ज्यामुळे कर्करोग अधिक वेगाने वाढतो. या प्रकारच्या स्तनाच्या कर्करोगाला एचईआर२ –पॉझिटिव्ह म्हणतात. याबाबात अधिक माहिती दिली आहे, डॉ. अजय शहा, व्यवस्थापकीय संचालक, न्यूबर्ग अजय शाह प्रयोगशाळा यांनी. काय आहे ही चाचणी? एफआयएसएच चाचणी स्तनाच्या कर्करोगाच्या ऊतींच्या नमुन्यात एचईआर२ जनुकाशी जोडलेले फ्लोरोसेंट रंग वापरून कार्य करते. या रंगांमुळे डॉक्टरांना हे पाहणे सोपे होते की





एचईआर२ जनुकाच्या जास्त प्रती आहेत किंवा प्रमाण जास्त आहे. चाचणी मध्ये एचईआर२ जनुकांची वाढ (बऱ्याच प्रती) झाल्याचे दिसत असल्यास कर्करोग एचईआर२ –पॉझिटिव्ह मानला जातो. नसल्यास, कर्करोग एचईआर२ –निगेटिव्ह आहे, याचा अर्थ त्याला वेगळ्या उपचार पद्धतीची आवश्यकता असू शकते.

एफआयएसएच चाचणीचे महत्त्व, ही चाचणी डॉक्टरांना स्तनाच्या कर्करोगाच्या रुग्णांसाठी गरजेनुसार उपाय योजना ठरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. एचईआर२ –पॉझिटिव्ह स्तनाचा कर्करोग वेगाने वाढतो आणि पसरतो, यासाठी विशिष्ट उपचारांची आवश्यकता असते. रुग्णावर ट्रॅस्टुझुमॅब (हर्सेप्टिन) किंवा इतर एचईआर२ –लक्ष्यित औषधांसारखे उपचार करता येतील का हे ठरविण्यात एफआयएसएच चाचणी मदत करते.

या थेरपीमध्ये, सामान्य, निरोगी पेशी सोडून कर्करोगाच्या एचईआर२ प्रथिने तयार करणाऱ्या पेशींवर हल्ला करण्यात येतो. यामुळे उपचार यशस्वी होण्याची शक्यता वाढते आणि पुन्हा त्रास होण्याचा धोका कमी करतो.

योग्य उपचारासाठी आवश्यक

एफआयएसएच चाचणी न केल्यास रुग्णांना त्यांच्या विशिष्ट प्रकारच्या स्तनाच्या कर्करोगासाठी योग्य उपचार मिळू शकत नाहीत. स्तनांचे सर्व कर्करोग एक सारखेच असतात असे नाही, म्हणून कर्करोग एचईआर२ –पॉझिटिव्ह आहे की एचईआर२ –निगेटिव्ह आहे हे समजून घेणे आवश्यक आहे. एचईआर२ स्थिती जाणून घेऊन, डॉक्टर उपचार पर्यायांबद्दल योग्य निर्णय घेऊ शकतात जेणेकरून योग्य परिणाम होऊन लवकर बरे होण्याची शक्यता वाढते.

महत्त्वाचे साधन थोडक्यात एफआयएसएच चाचणी म्हणजे स्तनाच्या कर्करोगाचे निदान आणि उपचाराचे एक महत्त्वाचे साधन. यामुळे कर्करोग एचईआर२ –पॉझिटिव्ह आहे की नाही हे ठरविण्यात मदत मिळते, डॉक्टरांना रुग्णासाठी सर्वात प्रभावी उपचार निवडण्यासाठी मार्गदर्शन करते. एचईआर२ –पॉझिटिव्ह स्तनाचा कर्करोग असलेल्या व्यक्तींसाठी, एफआयएसएच चाचणीमुळे कर्करोगा वर थेट मात करण्याचे उपाय डिझाइन करता येतील, ज्यामुळे वैयक्तिक गरजेनुसार उपचार करणे शक्य होऊन बरे होण्याचे प्रमाण वाढेल.

# निवडणूक प्रक्रियेत सर्वांनी सहभागी व्हावे, आदर्श आचारसंहिता पाळावी व मतदानाचा हक्क बजावावा -निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना (भाप्रसे)

किनवट/शेख शौकत :–भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूक–२०२४ चा कार्यक्रम मंगळवारी दि.१५ आक्टोंबर रोजी जाहीर झाली असून यात तारखेपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. नियोजन प्रमाणे निवडणूक घेण्याची आमची सर्व तयारी झालेली आहे. तेव्हा सर्व मतदारांनी निवडणूक प्रक्रियेत सहभाग घ्यावे आणि मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांनी केले.

निवडणूक कार्यक्रम घोषीत करण्याच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी किनवटच्या तहसीलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शारदा चौंडेकर , माहूरचे तहसीलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किशोर यादव, उपविभागीय पोलिस अधिकारी



रामकृष्ण मळघणे, नायब तहसिलदार मोहम्मद रफीक, रामेश्वर मुंडे व मीडिया कक्षाचे सहायक उत्तम कानिंदे उपस्थित होते. पुढे बोलतांना त्यांनी अशी माहिती दिली की, ८३–किनवट विधानसभा मतदारसंघात एकूण ३३१ मतदान केंद्रे असून २,७७,२०३ मतदार असुन त्यापैकी पुरुष मतदार संख्या १,४१,६७८ एवढी, स्त्री मतदार संख्या १,३५,५१४ एवढी व तृतीय पंथी संख्या ११ अशी संख्या आहे.

आयोगाने जाहीर केलेल्या तारखांनुसारः दिनांक २२ आक्टोंबर मंगळवार ही निवडणुकीच्या अधिसूचनेची तारीख असेल. दिनांक २९ आक्टोंबर मंगळवार ही उमेदवारी अर्ज करण्याची शेवटची तारीख असेल. दिनांक ३० आक्टोंबर बुधवार ही छाननीची तारीख असेल. दिनांक ४ नोव्हेंबर सोमवार ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असेल. किनवट मतदारसंघात दिनांक २० नोव्हेंबर बुधवार रोजी मतदान होणार आहे. मतमोजणी दिनांक २३ नोव्हेंबर शनिवार रोजी होणार आहे.

तेंव्हा सर्व राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि सर्व नागरीक यांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे. उपस्थितांचे आभार मानून त्यांनी पत्रकार बंधूना विनंती केली की, निवडणुकीशी संबंधित बातम्या सर्वांपर्यंत पोहोचवाव्यात.

# 'लाडकी बहीण'चे फॉर्म भरणा–या सेविका मानधनापासून वंचित



सांगली : प्रतिनिधी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरण्यासाठी अंगणवाडी सेविकांना प्रतिफॉर्म ५० रुपये प्रोत्साहनपर पैसे देण्यात येणार असल्याची घोषणा राज्य सरकारकडून करण्यात आली होती; पण त्यांना अद्याप एक रुपयादेखील मिळालेला नाही. लाडक्या बहिणीच्या खात्यावर या योजनेचे पैसे आले व अजून येणे सुरूच आहे; परंतु रात्रंदिवस कष्ट करून या योजनेचे फॉर्म भरणा–या अंगणवाडी सेविका मात्र वंचितच आहेत. शासनाने दिलेला शब्द पाळला नसल्याची त्यांची भावना आहे. सुमारे अडीच हजार सेविकांनी ऑगस्टपासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरण्याचे काम केले होते.

# मनपाचे माजी आयुक्त रमेश पवार यांचे निधन



लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून काम पाहिलेले रमेश पवार यांचे नुकतेच निधन झाले.ऑगस्ट २०२० मध्ये ते निवृत्त झाले होते. शनिवार दिनांक १२ऑक्टोबर रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात आई,भावंडे, मुलगा व मुलगी,सून, नातवंडे असा परिवार आहे.

१७ऑगस्ट १९६२ रोजी जन्म झालेल्या रमेश पवार यांचे शालेय शिक्षण पुणे येथील अभिनव हायस्कूल मध्ये झाले होते. त्यानंतर पुण्याच्याच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून १९८५ साली त्यांनी बी.ई. सिव्हील ही पदवी मिळवली.भारती विद्यापीठात अभियांत्रिकी सहप्राध्यापक म्हणून कार्यरत असताना महाराष्ट्र राज्य सेवा परीक्षा उत्तीर्ण होत १९९६ मध्ये पहिल्याच प्रयत्नात त्यांची मुख्याधिकारी वर्ग १ म्हणून निवड झाली. गोंदिया नगरपालिकेत मुख्याधिकारी म्हणून ते रुजू झाले.तेथे चार वर्ष काम केल्यानंतर लातूर नगरपालिकेत त्यांची बदली झाली.लातूर नंतर ठाणे मनपात उपायुक्त तसेच अहमदनगर मनपा आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगर विकास प्राधिकरणमध्ये उपमुख्य अधिकारी,पुणे विभागीय कार्यालयात उपायुक्त, नगर प्रशासन कार्यालयात उपसंचालक ,नाशिक मनपाचे अतिरिक्त आयुक्त,औरंगाबाद मनपा आयुक्त,लातूर मनपा आयुक्त,परभणी मनपा आयुक्त व नगरविकास मंत्रालयात सहसचिव म्हणून त्यांनी काम पाहिले.३१ ऑगस्ट २०२० रोजी ते निवृत्त झाले.

पवार यांच्या निधनाबद्दल लातूर मनपातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शोक संवेदना व्यक्त केली.एक कार्यक्षम प्रशासक गमावल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# बीड रोडवर दुतर्फा स्ट्रीट लाईटचा लखलखाट पाहून सौ. सितातार्ई बनसोड व हारुणभाईंचे जनतेनी मानले आभार

केज/प्रतिनिधी :– शहरातील बीड रोडवरील स्ट्रीट लाईट सुरु करण्यासाठी काही तांत्रीक अडचण येत होती म्हणून केजच्या नगराध्यक्षा सौ. सितातार्ई बनसोड व हारुणभाई इनामदार यांनी स्वत: याकडे लक्ष देऊन विजयादश्मीच्या पुर्व संध्येला शहरातील बीड रोडवर दुतर्फा स्ट्रीट लाईट सुरु होताच केज शहरातील नागरीकांनी व महीलांनी नगराध्यक्षा सौ. सितातार्ई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांचे फोनवर व समक्ष भेटून आभार मानले आहे.




केज शहरातील रोडचे काम गेल्या चार वर्षापासुन सुरु असल्याने शहरातील अनेक कामे करण्यासाठी अडचणी निर्माण होत होत्या तर दुसरीकडे केजचे सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले सर हे संघर्ष समितीच्या सदस्यांना सोबत घेऊन शहरातील विवीध समस्या सोडवण्यासाठी जनतेच्या वतीने अंदोलने करुन समस्या सोडवून घेण्यात त्यांना काही वेळा यश आले. केज शहरातील धारुर रोड व कळंब रोड वरील दुतर्फा स्टेट लाईट गेल्या वर्षीच सुरु झाल्या होत्या पण केज शहरातील बस स्थानक ते बीड रोड वरील शिक्षक कॉलनी या दरम्यान बसवलेल्या पोलवरील स्टेट लाईट बंद असल्याने भोसले सर यांनी एच.पी.एम.कंपनीने नियुक्त केलेले खाजगी अधिकारी हे भोसलेसरांना तारीख पे तारीख देत होते. भोसलेसरांनी एक अंदोलन बोलावून शहरात रस्ता रोको अंदोलन केले यावेळी तहसीलदार व नगरपंचायतचे मुख्याधिकारी व नगराध्यक्षा सौ. सीतातार्ई बनसोड मॅडम व हारूनभाई इनामदार यांना भोसले सरांनी समक्ष बोलावून घेऊन त्यांच्याकडून लेखी लिहून घेतले व बीड रोडवरील स्टेट लाईट लवकर सुरु न केल्यास केज शहरात आम्ही लोकशाही मार्गाने अंदोलन करण्याचा इशारा देताच एच.पी.एम कंपनीने शहरातील स्टेट लाईट सुरु करण्याचा पूर्ण कारभार हा नगरपंचायतकडे दिल्यानंतर केज नगरपंचायतच्या कर्तव्य दक्ष नगराध्यक्षा सिताताई बनसोड व हारुणभाई इनामदार यांनी याकडे लक्ष घालून त्यासाठी लागणारा निधी वरीष्ठ पातळीवरुन उपलब्द करुण घेतला आणि बीड रोडवरील शासकीय विश्रामगृहा समोर बीड रोडवरील स्टेट लाईटला विद्युत परवठा करण्यासाठी लागणारा एक ट्रान्सफार्मर गणेश चतुर्थि दिवशी बसवला आणि विजया दश्मीच्या सनाच्या शुभ मुहुर्तावर केज शहरातील बीड रोडवरील दुतर्फा विद्युत रोषनाईचा लखलखाट दिसताच केज शहरातील नागरीकांनी आणि महीलानी केजच्या नगराध्यक्षा सिताताई बनसोड व जनविकास परिवर्तनचे अध्यक्ष हारुणभाई इनामदार यांचे फोन वरुन व समक्ष भेटून आभार मानले.

# मांडवी ते सारखानी रस्त्यावर वाघाचे दर्शन नागरिकांमध्ये पसरले भीतीचे वातावरण



किनवट/शेख शौकत :– मांडवी ते सारखानी या रहदारीच्या राज्यमार्गावर सोमवारी (ता. १४) सायंकाळी अनेकांना वाघाचे दर्शन झाले. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वन विभागाने वाघाचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकाकून केली जात आहे. मांडवी ते सारखानी हा रस्ता वर्दळीचा असून, सोमवारी सायंकाळी वाटसरूंना वाघाचे दर्शन झाले. तालुक्यातील करंजी येथील हनुमान चौधरी (वय ३५) शेतात काम करीत असताना वाघ दिसताच आरडाओरडा करीत झाडावर चढला . यावेळी त्याच्या ह हातेही जखमी झाला. हनुमान किरकोळ जखमी झाला असून, त्याच्यावर सारखानी येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याने आरडाओरड केल्याने शेजारील शेतकरी धावून आल्यामुळे वाघ पळून गेला. तोच वाघ आता मांडवी सारखानी रस्त्यावर फिरत असल्याची माहिती नागरिकाकडून मिळाली आहे. वाघाचा बंदोबस्त करावा सध्या शेतात सोयाबीन काढणे व कापूस वेचणीची काम सुरू आहेत. शेतकरी व मजूरवर्गाला काम करण्यासाठी शेतात जावेच लागते शेतीवर काम करणाऱ्या शेतमजूर यांच्या मजुरी बुडायच्या शक्यता आहे. परंतु, अनेकांना वाघाचे दर्शन होत असल्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाने वाघाचा वेळीच बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकाकून होत आहे.

# बीडच्या खासदारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र! ट्रेनी शिक्षकांचा कालावधी वाढविण्याची केली मागणी

बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळावे, त्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री'युवा कार्य प्रशिक्षण योजना राज्यात सुरु केली.परंतु सदरील योजना राबवित असतांना ती पूर्णपणे यशस्वी होते का? हे पाहणे महत्वाचे आहे. मात्र प्रशिक्षणार्थी यांच्या निवेदनातून स्पष्ट होते की, या योजनेचा कालावधी शैक्षणिक वर्षात पूर्ण होत नाही. ही बाब लक्षात घेवून खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून कालावधी वाढविण्याची मागणी केली.त्यामुळे ट्रेनी शिक्षकांना दिलासा मिळणार आहे.




बीड/प्रतिनिधी :– शासनाने 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंर्गत ट्रेनी शिक्षक पदभरती केलेली आहे.त्याचा कालावधी सहा महिन्यांचा आहे.परंतू या कालावधीत शैक्षणिक वर्ष पूर्ण होत नाही. त्यामुळे वाढीव कालावधी देवून निवड झालेल्या ट्रेनी शिक्षकांना दिलासा द्यावा.अशा मागणीचे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

राज्य शासनाकडून 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजना कार्यान्वित आहे. त्या योजनेच्या माध्यमातून राज्यातील जिल्हा परिषद शाळेत ट्रेनी शिक्षकांची पदभरती करण्यात आली आहे.मात्र शैक्षणिक वर्ष पाहता, सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण होत नाही. त्यामुळे 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी वाढविणे आवश्यक आहे.असे निवेदन प्रशिक्षणार्थींनी माझ्याकडे दिले आहे.त्या निवेदनातून त्यांनी विनंती केली आहे की, खासदार या नात्याने आमची मागणी राज्य सरकारकडे कळवावी आणि ट्रेनी शिक्षकांना न्याय मिळवून द्यावा.

बीडसह राज्यातील ट्रेनी शिक्षकांचा हा प्रश्न लक्षात घेता, त्यांची मागणी योग्य आणि रास्त आहे.त्यामुळे 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी पूर्ण होण्यासाठी संबंधित विभागास आदेशीत करावे.असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

# टिबी विरुद्धच्या लढाईत बीसीजीची लस विश्वसनीय यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात क्षयरोग, एड्स रुग्णावर मोफत उपचार

लातूर : – क्षयरोग आणि एड्स बाधित रुग्ण यांच्यावर तातडीने उपचार करण्यासाठी यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात अद्यावत मशिनरीसह टीबी लसीकरण आणि एआरटी नवीन कक्षाचा शुभारंभ एमआयटी मेडिकल कॉलेजचे परिसर समन्वयक पृथ्वीराज रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आला.

लातूर येथील एमआयटी मेडिकल कॉलेजच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात विविध प्रकारच्या रुग्णांना सोयी सुविधा आणि अद्यावत उपचार मिळावे यासाठी कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात. विविध प्रकारच्या रुग्णांना शासनाच्या सोयीसवलती मिळवून दिल्या जातात त्याचबरोबर रुग्ण बरे व्हावेत, योग्य आणि तात्काळ उपचार व्हावेत यासाठी रुग्णालयाच्या वतीने मेहनत घेतली जाते.




यशवंतराव चव्हाण रुग्णालयातील अद्यावत तपासणी मशीनच्या शुभारंभ बरोबरच टीबी विरुद्धच्या लढाईत विश्वासाने दिल्या जाणाऱ्या बीसीजीच्या मोफत लसीकरणाचा शुभारंभ प्रसंगी एमआयटी मेडिकल कॉलेज परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांच्यासह मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार, उप अधिष्ठाता डॉ. बसवराज नागोबा, शैक्षणिक व प्रशासकीय संचालिका डॉ. सरिता मंत्री, रुग्णालय अधीक्षक डॉ. एकनाथ माले, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सौ. तांबारे, भातांगळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. सगिरा पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये हवेद्वारे पसरतो या रोगांची तातडीने थुंकी व शरीरातील इतर द्रव्याची तपासणी करणे गरजेचे असून यशवंतराव चव्हाण रुग्णालयात नव्याने दाखल झालेल्या अद्यावत मशीनद्वारे मोफत दोन तासात निदान केले जाणार आहे. या मशीनच्या शुभारंभ बरोबरच एड्स बाधित रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष निर्माण केला असून या कक्षाद्वारे तपासणी उपचार आणि समुपदेशन करण्यात येणार आहे या कक्षाचाही शुभारंभ करण्यात आला. यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील या कार्यक्रमाचे नियोजन प्रकल्प समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली नोडल ऑफिसर तथा विभाग प्रमुख डॉ आर. एन. तोष्णीवाल, डॉ अनिल जाधव यांनी केले होते. याप्रसंगी प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, डॉ. लक्ष्मण कस्तुरे, डॉ. भागवत शेळके, रुग्णालय प्रशासकीय अधिकारी श्रीपती मुंडे यांच्यासह विविध विभाग प्रमुख रुग्णालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# काशी विश्वनाथ यात्रा पूर्ण करून सुखरूप घरी पोहोचलेल्या भाविकांचा सामाजिक कार्यकर्ते अंकुशराव पाटील जाधव व माधव धुमाळे यांच्यावतीने सर्व भाविकांना पुष्पहार देऊन केले स्वागत....

नायगाव /प्रतिनिधी :– नायगाव तालुक्यातील मुस्तापूर येथील ६० भाविक तीर्थयात्रा म्हणून श्रीक्षेत्र काशी विश्वनाथ दर्शनासाठी ८९ नायगांव विधानसभा मतदारसंघातील संघातील लोकप्रिय आमदार राजेश पवार यांच्या वतीने ट्रीप आत्ता ११ ऑक्टोबर रोजी काढण्यात आला होता व त्यात गावातील सामाजिक कार्यकर्ते अंकुश पाटील जाधव व माधव धुमाळ यांच्या सहकार्याने भाविक काशी येथील विश्वनाथाच्या दर्शनासाठी गेले होते व ते सुखरूप परत आपल्या गावी पोहोचले असता हनुमान मंदिर परिसरात सर्व भाविकांना पुष्पगुच्छ व पुष्पहार देऊन अंकुश पाटील मित्र मंडळाच्या वतीने हनुमंत रायाची पूजा आरती व प्रसाद वाटप करून सर्व काशी यात्रेकरूंचं सर्वांचा सन्मान करून केले व आमदार राजेश पवार याचे आभार मानले भाविकांनी हर हर महादेव, छत्रपती शिवाजी महाराज की जय, राजेश पवार तु आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणा दिल्या व आमदारचे जाहीर आभार मानले याप्रसंगी गावातील नागरिक काशी विश्वनाथ दर्शनासाठी गेलेले पुरुष भक्त व महिला भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE